
Prashant Jawade: Yavatmalatil Samajik Samassya wa Upay



ISBN 978-81-939083-4-1

# भारतीय राजकारण

भारतीय राजकारणावरील विविध शाखांच्या अध्यापकांनी
घेतलेल्या संशोधनपर लेखांचा संपदित ग्रंथ

संपादन
**डॉ. अनिल विश्वास**

टिआरा पब्लिकेशन्स
दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२९
tiarapublication@rediffmail.com

मूल्य दोनशे रुपये

❒ ISBN 978-81-939083-4-1

❒ भारतीय राजकारण
Bhartiya Rajkaran

❒ संपादन
डॉ. अनिल विश्वास

❒ सर्व हक्क सुरक्षित

❒ प्रथमावृत्ती १ ऑगस्ट, २०१९

❒ प्रकाशन क्र. २४

❒ प्रती ५००

❒ आकार डेमी

❒ प्रकाशक
टिआरा पब्लिकेशन्स
दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२९
tiarapublication@rediffmail.com

❒ मूल्य २०० रुपये

(या ग्रंथात प्रकाशित विचार हे त्या त्या मान्यवरांचे असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय, अनुक्रमणिका | | 3-5 |
| 1 | भारतातील लोकशाही | प्रा. रेखा वाठ | 6-8 |
| 2 | जागतिक राजकारणाची बदलती पद्धत | डॉ. अभय रानडे | 9-12 |
| 3 | राजकीय पक्षांची भूमिका | प्रा. एन.आर. उवळे | 13-15 |
| 4 | सत्तासंघर्षात पक्षाची बदलती भूमिका | डॉ. संजय वानखडे | 16-20 |
| 5 | भारत—चीन संबंध — एक अभ्यास | प्रा. डी.एस. पाटील | 21-23 |
| 6 | राजकारणातील राजकीय पक्षाचे बदलते स्वरूप | डॉ. सावित्री सनागळे | 24-26 |
| 7 | सत्तातरांचे बदलते स्वरूप विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा.सरोज लखदिवे | 27-29 |
| 8 | भारतीय राजकारण आणि राजकीय पक्ष | प्रा. डॉ. सुशीला डाबरे | 30-32 |
| 9 | राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्त्व: एक अध्ययन | प्रा. नीळकंठ नरूले | 33-35 |
| 10 | यवतमाळातील सामाजिक समस्या व उपाय | प्रा. प्रशांत जवादे | 36-38 |
| 11 | महाराष्ट्राच्या राजकारणात वंचित बहुजन आघाडी | डॉ. संदेश सामटकर | 39-41 |
| 12 | बदलत्या परराष्ट्र धोरणाचा जागतिक राजकारणावर झालेला परिणाम | डॉ. कैलाश नेमाडे | 42-44 |
| 13 | राजकारणात नैतिक मापदंडाची पायमल्ली | डॉ. एस. एम. टाकळे | 45-49 |
| 14 | आपल्या देशापुढील परराष्ट्र धोरणाची आव्हाने | डॉ. गिरीधर साळवे | 50-52 |
| 15 | परराष्ट्र धोरण आणि आपली भूमिका | डॉ. डी.एम. चव्हाण | 53-55 |
| 16 | विविध राजकीय पक्षांची बदलती भूमिका — एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. पांडुरंग इंगळे | 56-57 |
| 17 | राजकारण आणि भारतीय राजकीय पक्षांचे बदलते स्वरूप | प्रा. दमयंती वाळके | 58-59 |
| 18 | इतिहासात महिलांचे स्थान : ऐतिहासिक अवलोकन | प्रा. शीतल राऊत | 60-63 |
| 19 | राजकीय पक्षांची बदलती भूमिका व परिणाम | प्रा. माणिकराव पवार | 64-65 |
| 20 | भारतीय राजकारण आणि भारतीय राजकीय पक्षांची बदलती पध्दत | प्रा.स्नेहल खांडेकर | 66-68 |
| 21 | राज्याच्या लोकशाहीत पक्षाची बदलती कार्यपध्दती | प्रा. डॉ. संजय बनसोडे | 69-70 |
| 22 | भारतीय संविधान | डॉ. वेद पतकी | 71-74 |
| 23 | भूतपूर्व पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग | डॉ. वीरा मांडवकर | 75-77 |
| 24 | राजकीय पक्षांचे सत्तास्वार्थ | प्रा.डॉ. वैदेही सामरा | 78-83 |

# यवतमाळातील सामाजिक समस्या व उपाय

प्रा. प्रशांत जवादे
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रस्तावना :—

भारत हा प्रचंड लोकसंख्या असलेला द्वितीय क्रमांकाचा देश म्हणून ओळखला जातो. या भारतात अनेक जातीधर्म, पंथ आणि समुदाय वास्तव्याला असलेले आपणास दिसून येतात. हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून ओळखल्या जाते. या धर्मनिरपेक्ष राष्ट्रात अनेक समुदाय अर्थात समाज वास्तव्याला आहेत. प्रत्येक समाजात विविध समस्या ''आ''वासून उभ्या आहेत. आज भारतात अनेक नावाचे समाजबांधव आहेत. त्या समाजाची नामावली सांगणे सुद्धा कठीण गोष्ट आहे.

## विषयाची निवड :—

प्रस्तुत विषय जेव्हा संशोषनासाठी निवडला तेव्हा प्रथम असे लक्षात आले की, भारतात विखुरलेल्या विविध समाजामधील प्रमुख समस्यांचा आपण विचार केला व संशोधन करण्यास सुरूवात करतो म्हटले तर शक्य होईलच असे नाही आणि त्यासाठी मोठया प्रमाणात वेळ, पैसा व श्रम खर्च करावी लागतील. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास या विषयासाठी आपण फक्त यवतमाळ जिल्हयातील समाजांच्या समस्या शोधून काढून त्यावर उपाययोजना काय करता येईल याचा विचार केला व प्रस्तुत विषय संशोधनपर लेख लिहिण्याकरीता घेतला आहे.

## संशोधनाचा हेतू :—

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाचा मुख्य हेतू असा की,

१) यवतमाळ जिल्हयातील विविध समाजामध्ये असलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

२) समाजात असलेल्या समस्या कशा कमी करता येतील यावर संशोधन करणे.

३) शासनात किंवा मानवनिर्मित हया समस्या आहेत का ? याची पडताळणी करणे.

४) यवतमाळ जिल्हयातील विविध समाजात असलेल्या समस्यांवर उपाय शोधणे ?

## संशोधनाची पद्धती :—

कोणत्याही विषयाच्या संशोधन कार्यापूर्वी संशोधकाला त्याची पद्धत निश्चित करावी लागते. त्यामुळे प्रस्तुत संशोधन कार्यासाठी निरीक्षणात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

## नमुना निवड :—

प्रस्तुत विषयाच्या सखोल व विस्तृत अध्ययनाकरिता यवतमाळ जिल्हयातील विविध समाजापैकी फक्त ४ म्हणजे कुणबी, बंजारा, बौद्ध, आदिवासी समाजाचीच निवड केली असून या ४ समाजामधील प्रत्येकी १० एककाकडून काही प्रश्नावली भरून घेतली व प्रस्तुत विषयाची माहिती गोळा करून विश्लेषण करण्यात आले आहे.

## तथ्याचे विश्लेषण :—

यापूर्वी नमूना निवड पद्धतीमध्ये नमुद केल्याप्रमाणे संशोधकांनी एकूण ज्या ४० प्रश्नावली भरून घेतल्या त्यावरून जे तथ्य हाती आले तेव्हा मोठया प्रमाणात यवतमाळ जिल्हयात सामाजिकदृष्टया व राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक समस्या असल्याचे दिसून आले. सामाजिक समस्यामध्ये कुपोषण, कुमारी माता, जातीभेद, वृद्धाश्रमाची वाढ, अनिष्ठ रूढी, प्रथा, अंधश्रद्धा हया मोठया प्रमाणात दिसून आल्या आहेत. राजकीय समस्येमध्ये महिला नेतृत्वाचा अभाव, तरूण नेतृत्वाचा उदय कमी, निस्तेज वरिष्ठ नेते, स्वार्थी राजकारणी, आर्थिक समस्या ही जिल्हयात फार मोठी समस्या आहे. एकेकाळी पांढरं सोन म्हणून यवतमाळ जिल्हा ओळखला